# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** पुणे ग्रामीण **P.S.(ठाणे):** वडगांव निंबाळकर
   **FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0040 **Year (वर्ष):** 2026
   **Date and Time of FIR (प्र. ख. दिंनाक आणि वेळ):** 05/03/2026 10:18

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबधक अधिनियम, १९८८ | 7(a) |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
   1. **Day(दिवस):** दरमियानी दिन
      **Date From (दिंनाक पासून):** 26/02/2026
      **Time Period (कालावधी):**
      **Date To ( दिंनाक पर्यंत):** 04/03/2026
      **Time From (वेळेपासून):** 11:22 बजे
      **Time To (वेळेपर्यंत):** 11:24 बजे

   (b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
   **Date (दिंनाक ):** 05/03/2026 **Time (वेळ):** 10:02 बजे

   (c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
   **Entry No. (नोंद क्र.):** 009
   **Date & Time (दिंनाक आणि वेळ):** 05/03/2026 10:02 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
   1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
   पश्चिम, 7 किमी **Beat No. (बिट क्र.):**
   (b) **Address (पत्ता):** सर्कल कार्यालय वडगाव निंबाळकर , सोमेश्वर पेटोलपंपाजवळील,गायकवाड बिल्डींगजवळ

   (c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
   **Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
   **District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): आसावरी जगन्नाथ शेडगे

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1991

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे ,वडगांव निंबाळकर,पुणे ग्रामीण,महाराष्ट्र, भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे ,वडगांव निंबाळकर,पुणे ग्रामीण,महाराष्ट्र, भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-8425808058

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | सोमनाथ संपत महानवर | | | 1. गडदरवाडी पोस्ट खंडोबाची वाडी त,वडगांव निंबाळकर,पुणे ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विंलबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

**11.Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12.First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

नमुद वेळी

आदरणीय सर...
जयहिंद
वडगाव निंबाळकर पोलीस स्टेशन
वडगाव निंबाळकर पो स्टे गु.र.नं :- 40/2026 भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम 1988 चे कलम 7 अ

फिंयादी : आसावरी जगन्नाथ शेडगे,वय-35 वर्षे व्यवसाय नोकरी,पद-पोलीस निरीक्षक,लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे मो.नं.8425808058.

आरोपी :- सोमनाथ संपत महानवर वय 35 वर्षे धंदा शेती(कॅन्डीडेत निंबूत तलाठी कार्यालय व सर्कल कार्यालय वडगाव निंबाळकर)रा.गडदरवाडी पोस्ट खंडोबाची वाडी ता.बारामती जि.पुणे.

गु.घ.ता.वेळ व ठिकाण :दिंनाक 26/02/2026 रोजी 11.22 ते 17.20 वा दरम्याण सर्कल कार्यालय वडगाव निंबाळकर येथे दि.4/3/2026 रोजीच्या 11.24 ते 17.25 वाजता दरम्यान सोमेश्वर पेटोलपंपाजवळील गायकवाड बिल्डींगजवळ

हकीगत- वर नमुद केले तारीख वेळी व ठिकाणी यातील आरोपी मजकुर याने दि.26/02/2026 रोजी 11.22 ते 17.20 वा दरम्याण सर्कल कार्यालय वडगाव निंबाळकर येथे करण्यात आलेल्या पडताळणी कारवाई दरम्याण यातील आरोपी खाजगी इसम सोमनाथ महानवर यांनी तक्रारदार यांच्या सातबारा नोंदी घेण्याकरीता वडगाव निंबाळकर सर्कल मोहिते यांचेकरीता 20000/-व तलाठी जयश्री तनपूरे यांचेकरीता 5000 ते 6000 लाचेची रक्कम मागणी केल्याचे निष्पन्न झाले तसेच दि.4/3/2026 रोजीच्या 11.24 ते 17.25 वाजता दरम्यान सोमेश्वर पेटोलपंपाजवळील गायकवाड बिल्डींगजवळ करण्यात आलेल्या पडताळणी पंचानामा कारवाई दरम्यान यातील आरोपी खाजगी इसम सोमनाथ संपत महानवर यांनी तक्रारदार यांच्या सातबारा नोंदी सर्कल यांचेकडून प्रमाणित करण्याकरीता सर्कल मोहिते यांचेकरीता 15000 रुपये व तलाठी जयश्री तनपूरे यांचेकरीता 1 ते 2 हजार रुपयाची लाचेची मागणी पंचासमक्ष करुन तडजोडीअंती दि.4.03.2026 रोजी हॉटेल महाकाली रसव्ंती ग्रह निरा बारामती रोड येथे तक्रार दार यांची चार चाकी वाहनामध्ये बसुन खाजगी इसम सोमनाथ महानवर यांनी पंचासमक्ष 15,000/- रुपये लाच रक्कम तक्रारदार किर्तीराज लकडे यांचेकडुन स्विकारली म्हणुन माझी सोमनाथ संपत महानवर वय 35 वर्षे धंदा शेती(कॅन्डीडेत निंबूत तलाठी कार्यालय व सर्कल कार्यालय वडगाव निंबाळकर)रा. गडदरवाडी पोस्ट खंडोबाची वाडी ता.बारामती जि.पुणे.यांचे विरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम 1988 चे कलम 7 अ प्रमाणे कायदेशिर सरकारतर्फे फिंयाद आहे. गुन्ह्याचा पुढील तपास पो नि सुहास हट्टेकर हे करीत आहेत.

दाखल अंमलदार पो ना मारकड 960

तपासी अंमलदार पो नि सुहास हट्टेकर 9881873330
स्टेडा नं 7 वेळ 10.02

फिर्यादी जबाब दि.05/03/2026.

मी आसावरी जगन्नाथ शेडगे,वय-35 वर्षे व्यवसाय नोकरी,पद-पोलीस निरीक्षक,लाचलुचपत प्रतिंबधक विभाग पुणे मो.नं.8425808058.

मी वरील प्रमाणे असुन लाचलुचपत प्रतिंबधक विभाग पुणे येथे पोलीस निरीक्षक म्हणुन कार्यरत आहे.दि. 25/02/2026 रोजी 14.45 वा लाचलुचपत प्रतिंबधक विभाग,पुणे येथे हजर असतांना प्रशासन अधिकारी श्री. दयानंद गावडे, पोलिस उप-अधिक्षक, ला.प्र.वि पुणे यांनी त्यांचे कार्यालयात बोलावून तक्रारदार किर्तीराज चंद्रकांत लकडे वय-31 वर्षे व्यवसाय-शेती,रा.ठि.निंबूत,कोळेवस्ती ता.बारामती जि.पुणे यांची लाच मागणी बाबत तक्रार असुन आपण त्यांची तक्रार ऐकुन पुढील कायदेशिर कारवाई करा असे आदेशित केले व सदर कारवाइकरीता लाचलुचपत कार्यालयात गोपणीय कारवाई करीता उपलब्ध असलेले शिक्षण विभागाचे पंच 1) श्री.वेदांग मधुकर बिबवे, वय- 36 वर्षे, व्यवसाय –नोकरी, पद- लिपीक टंकलेखक, शिक्षण विभाग(प्राथमिक विभाग), पुणे रा. 574/3, यश लॉन्स,ओम बंगलो,बिबवेवाडी पुणे व पंच 2) श्री.समीर मधु गायकवाड, वय - 36 वर्षे, व्यवसाय – नोकरी, पद- लिपीक टंकलेखक, शिक्षण विभाग (प्राथमिक विभाग), पुणेरा. व्हिन्सर काऊंटी सोसायटी, दत्तनगर चौक,कात्रज,पुणे असे दिले तसेच सदर कारवाईकामी पोशि 9175/कुमकर, पोशि1966/तावरे, पोशि2845/आडके तसेच शासकीय वाहन एमएच 12 युसी 4105 वरिल चालक पोहवा माळी असे पथक दिले. त्यानंतर आम्ही,पंच, सापळा पथक, तक्रारदार यांना आमच्या कक्षात घेवून जावून तक्रारदारांची सापळा पथकाची दोन्ही पंचांची आपसात ओळख करून दिली व ओळख करून घेतली. त्यानंतर तक्रारदार यांचे तक्रारीवरून करण्यात येणा-या पडताळणी व सापळा कारवाईकामी पंच साक्षीदार म्हणून काम करण्यास तयार आहात का? अशी आम्ही दोन्ही पंच साक्षीदारांना विचारणा केली असता त्यास त्यांनी सहमती दिली. त्यानंतर आम्ही तक्रारदार व दोन्ही पंच साक्षीदार यांना लाचलुचपत प्रतिंबधक विभागाकडून केल्या जाणा-या पडताळणी व सापळा कारवाईबाबत सविस्तर तपशिलवार माहिती दिली.
आम्ही तक्रारदार यांना त्यांचे तक्रारीबाबत विचारणा करता तक्रारदार श्री.लकडे यांनी त्यांची तक्रार प्रथम तोंडी कथन केली. सदर तोंडी तक्रार ऐकल्यानंतर त्यानुसार करण्यात येणा-या पडताळणी व सापळा कारवाईकामी पंच साक्षीदार क्र.1 म्हणून श्री.वेदांग बिबवे व पंच साक्षीदार क्र.2 म्हणून श्रीमती समीर गायकवाड काम पाहतील असे आम्ही ठरविले.त्यांनतर तक्रारदार यांनी त्यांची तक्रार स्वहस्ताक्षरात पंचासमक्ष लिहून दिली ती थोडक्यात पुढीलप्रमाणे .....

तक्रारदार यांचा मौजा निंबूत ता.बारामती जि.पुणे येथे गट क्रमाक व उपविभाग 86/2/प्लॉट नं/3 याठिकाणी सहा गुंठयाचा प्लॉट आहे.सदर प्लॉटची 1500 स्वेअर फूटचा एक प्लॉट याप्रमाणे चार प्लॉट मध्ये विभागणी करण्याकरीता तक्रारदारांनी भूमीअभिलेख कार्यालय बारामती मार्फत सदर प्लॉटची मोजणी करुन फाळणी बाराप्रमाणे क.जा.प. केले आहे.सदर फाळणी करण्यात आलेल्या एकूण 4 प्लॉटचे सातबारा नोंदी करण्याकरीता उपअधिक्षक भूमि अभिलेख कार्यालय बारामती यांनी तहसिलदार बारामती यांना पत्रव्यवहार केला असून तहसिलदार बारामती यांनी निंबूत गावचे तलाठी जयश्री तनपूरे यांना तक्रारदार यांच्या एकुण 4 प्लॅाटचे सातबारा नोंदी घेण्याकरीता दि.11/2/2026 रोजीच्या पत्रान्वये आदेशित केले आहे.तहसिलदार बारामती यांचा आदेश तक्रारदार यांनी स्वत दि.12/2/2026 रोजी निंबूत गावचे कोतवाल सोमनाथ महारनवर यांना दिला आहे.दि. 18/2/2026 रोजी तक्रारदार यांनी कोतवाल सोमनाथ महारनवर यांची निंबूत तलाठी कार्यालय येथे जावून भेट घेवून सातबारा नोंदीबाबत विचारले असता कोतवाल सोमनाथ महारनवर यांनी तक्रारदार यांचेकडे सातबारा नोंदी करण्याकरीता निंबूत गावचे सर्कल मोहिते व तलाठी जयश्री तनपूरे यांना तसेच त्यांच्या स्वतकरीता एका प्लॉटसाठी 5000/-प्रमाणे 4 प्लॉटसाठी 20000/- रुपये लाचेची मागणी केली.सदरची रक्कम कोणतीही शासकीय फी नसून लाच रक्कम असलेबाबत तक्रारदार यांना खात्री होती त्यामुळे ती तक्रारदार यांना देण्याची इच्छा नसल्याने तक्रारदार यांनी कोतवाल सोमनाथ महारनवर,तलाठी जयश्री तनपूरे व सर्कल मोहिते यांचे विरुध्द कारवाई व्हावी अशा मजकुराची तक्रार तक्रारदार यांनी लाचलुचपत प्रतिंबधक विभाग पुणे येथे दिली. सदरबाबत सविस्तर उल्लेख तक्रारदार किर्तीराज लकडे यांच्या मुळ तक्रारीमध्ये आहे.तक्रारदार यांच्या तक्रारीवर तक्रारदार, आम्ही व दोन्ही पंचांनी वाचून त्यावर समक्ष सहया केल्या.

त्यानंतर आम्ही पंचासमक्ष तक्रारदार श्री.लकडे यांना नमूद लोकसेवक यांनी कधी व कुठे भेटण्यास बोलाविले आहे अशी विचारणा करता तक्रारदार यांनी सांगितले कि, दोन ते तीन दिवसापासुन तक्रारदार हे कोतवाल

सोमनाथ महारनवर यांना फोन करत आहेत मात्र ते तक्रारदार यांचा फोन घेत नसल्याने दि.26/02/2026 रोजी थेट तलाठी कार्यालय, निंबुत येथे सकाळी 11.30 वाजता जावुन भेट घेवून बोलणार आहेत.त्यामूळे आम्ही दि. 26/02/2026 रोजी पुढील कारवाई करण्याचे ठरविले.तेव्हा तक्रारदार यांनी आम्हाला निरा-लोणंद रोडवरील नम्रता सÐव्हस सेंटर, इंडियन ऑईल पेंट्रॉल पंप याठिकाणी येण्यास सांगितलेने त्याप्रमाणे पंचाना व सापळा पथकाला दिंनाक 26/2/26 रोजी सकाळी 08-30वाजता लाप्रवि कार्यालय पुणे येथे हजर राहण्याच्या सुचना दिल्या.

आम्ही दिलेल्या सुचने प्रमाणे दि.26/2/2026 रोजी सकाळी 08.30 वाजता लाचलुचपत प्रतिंबधक विभाग पुणे येथे दोन्ही पंच व सापळा पथक हजर झाले. त्यानंतर 08.50 वा चे सुमारास शासकिय वाहनामधुन पडताळणी व सापळा कारवाईसाठी लागणारे साहीत्य घेऊन ला.प्र.वि कार्यालय पुणे येथुन निघुन निरा- लोणंद रोडलगत असलेल्या नम्रता सÐव्हस सेंटर, इंडियन ऑईल पेंट्रॉल पंप येथे पोहोचलो ती वेळ 11.22 वा ची होती. सदर ठिकाणी तक्रारदार लकडे हे त्यांच्याजवळील सुझुकी कंपनीची मोटारसायकल क्र. एमएच 12 वाय.वाय 4242 सह हजर होते.त्यानंतर शासकीय वाहनातुनच पडताळणी कारवाई करण्याचे ठरवून आम्ही तक्रारदार लकडे यांना शासकीय वाहनात बसविले.

त्यानंतर आम्ही तक्रारदार दोन्ही पंच व सापळा पथकास पडताळणी कारवाईचे अनुषंगाने योग्य त्या सर्व सुचना दिल्या व आमचेकडील शासकिय व्हॉईस रेकॉर्डर मध्ये पंचासमक्ष नवीन सिंलबद मेमरी कार्ड SANDISK ULTRA 32 GB micro sd hc i (4) 3484 DEVSH13E BM MADE IN CHINA अशा वर्णनाचे टाकले व तक्रारदार श्री.किर्तीराज लकडे यांचे पडताळणी कारवाईचे अनुशंगाने निवेदन घेऊन त्यापाठोपाठ पंच क्र. 1 व 2 यांचे निवेदन घेतली ती वेळ 11.40 वा.ची होती. सदर निवेदन घेतेवेळी नवीन मेमरी कार्ड त्याचे एका बाजुस EVM ELite 32 GB Micro SD HC I 10C IU V10 व मागील बाजूस EEYF 32GMR0825 0032F5A55 W2517044242 असे असलेल मेमरीकार्डमध्ये पंचासमक्ष व्हिडीओ चित्रीकरण करण्यात आले आहे.त्यानंतर 12.14 वा व्हॉईस रेकॉर्डर पुन्हा चालु करून तो कोणासही संशय येणार नाही अशा पध्दतीने तक्रारदार श्री लकडे यांना लावला व त्यांना पंच क्र.1 यांचेसोबत तक्रारदार यांचे दुचाकी वाहनमोटारसायकल क्र. एमएच 12 वाय.वाय 4242 ने तलाठी कार्यालय निंबूत येथे लोकसेवक कोतवाल व तलाठी जयश्री तनपूरे यांची भेट घेण्याकरीता रवाना केले.

त्यानंतर काही वेळाने तक्रारदार व पंच परत आले त्यावेळी तक्रारदार यांचेकडील व्हॉईस रेकॉर्डर काढून बंद केला ती वेळ 13.52 वाजताची होती.आम्ही तक्रारदार व पंच क्र.1 बिबवे यांना शासकीय वाहनात बसवून पंच क्र.1 बिबवे यांना दरम्यान घडलेल्या हकिकतेबाबत विचारणा केली असता त्यांनी सांगितले की,तक्रारदार यांचे मोटार सायकल वरुन तलाठी कार्यालयात गेल्यानंतर सदरठिकाणी तलाठी तनपूरे व कोतवाल महारनवर नसल्याने तक्रारदार व पंच क्रं 1 सर्कल ऑफिस वडगाव निंबाळकर येथेगेले त्याठिकाणी सर्कल मोहिते,तलाठी तनपूरे हे मिटींग मध्ये होते. त्यावेळी तक्रारदार यांनी समोर उभे असलेले कोतवाल सोमनाथ महारनवर यांना हाक मारुन एका बाजुला बोलावून घेतले तेव्हा लोकसेवक महारनवर यांना पंच क्रं 1 यांचा संशय आल्याने त्यांनी पंच क्रं 1 यांना हाताने इशारा करून तेथेच थांबण्यास सांगितले. त्यावेळी पंच क्रं 1 यांना तक्रारदार व कोतवाल महारनवर यांच्यात बोलणे व हातवारे चालू असलेले दिसत होते परंतु त्यांचेतील संभाषण ऐकु येत नव्हते. त्यांची चर्चा झाल्यानंतर पंच क्रं व तक्रारदार असे मोटार सायकलने आम्ही थांबलेल्या ठिकाणी परत आले.असे सांगितले.

त्यानंतर आम्ही पंचासमक्ष तक्रारदार श्री.किर्तीराज लकडे यांना घडलेल्या हकिकतेबाबत विचारणा केली असतात्यांनी पंच क्र.1 श्री बिबवे यांनी वरिलप्रमाणे सांगितलेल्या हकिकतेपर्यंतची सर्व हकिकत सांगितली व लोकसेवक महारनवर यांनी पंचांना इशारा करून बाजुला थांबवल्यानंतर तक्रारदार व लोकसेवक महारनवर यांचेत तक्रारदार यांचे कामासंदर्भाने झालेल्या चर्चेची हकिकत सांगितली ती पुढीलप्रमाणे-
*तक्रारदार यांनी सोमनाथ महारनवर यांना विचारले कि,अन मॅडमचं कसं काय करायचं* (01.06.28) *त्यावर तक्रारदार यांनी* सोमनाथ महारनवर यांनी मॅडमचं बघु तिंथ आल्यावरं...ते आपलं... असे उत्तर दिले त्यावर तक्रारदार यानंी *त्यांना परत नाय ...नाय ती मोकार हयांच्यागत आकडा सांगितला तर मी काय करु.. असे सांगितले त्यावर सोमनाथ महारनवर हे हम्म ते बी हाय.. असे उत्तर देतात. त्यावर तक्रारदार सोमनाथ महारनवर यांना किती घेतात...?असे विचारले असता लोकसेवक सोमनाथ महारनवर यांनी काही तरी दयायचं पाच...पाच-सहा हजार तुमच्या मनानं (01.06.44 वा ) असे सांगितले त्यावर तक्रारदार यांनी सदर पैशाची खात्री करण्यासाठी पुन्हा पाच सहा हजार (01.06.44) असे विचारले असता लोकसेवक महारनवर यांनी हा... असे बोलुन सहमती दर्शवली त्यावर तक्रारदार यांनी त्यांनी त्यांची पंधरा अन पाच...वीस हजार...पाच हयांचे....तुमचे किती ?असे विचारले असता लोकसेवक सोमनाथ महारनवर यांनी हयांचे बघु मी लावतो फोन* (01.06.52)असे बोलले.त्यानंतर तक्रारदार यांनी

कोतवाल सोमनाथ महानवर यांना सर्कल कधी येणार आहेत याबाबत विचारणा केली असता सर्कल हे 03.00 नंतर येणार असलेबाबत कोतवाल महारनवर यांनी सांगितले त्यावर तक्रारदार यांनी 3.00 वाजता येतो असे बोलून सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी परत आले.

त्यानंतर तक्रारदार यांनी आम्हाला कल्पना देवून त्यांचेकडील दुचाकी त्यांचे घरी ठेवून त्याऐवजी त्यांचेकडील चारचाकी वाहन सुझुकी बलेनो क्र. एम एच 12 डब्लु के 8418 हे घेवून सदर ठिकाणी हजर झाले. त्यानंतर आम्ही तक्रारदार यांना शासकीय वाहनामध्ये बसवुन पुन्हा दिलेल्या सुचनांची उजळणी केली. त्यानंतर आमचे सुचनेवरून पोशि आडके यांनी 15.22 वा. व्हाईस रेकॉर्डर पुन्हा चालू करुन तो तक्रारदार यांच्या शर्टचे आतील बाजुस बनियानला सेफ्टीपिनचे सहाय्याने लावला व तक्रारदार श्री.लकडे व पंच क्र.1 श्री.बिबवे असे तक्रारदार यांचेकडील चारचाकी वाहन क्र. एम एच 12 डब्लु के 8418 ने वडगाव निंबाळकर येथाील सर्कल कार्यालयात रवाना केले. त्यानंतर आम्ही,सापळा पथक ,पंच क्रं 2 यांचेसह निरा बारामती रोडवरील अभिषेक मंगल कार्यालय शेजारील मोकळ्या जागेत जावुन थांबुन तक्रारदार यांना लोकेशन पाठविले व त्याठिकाणी येण्यास सांगितले.

त्यानंतर काही वेळाने तक्रारदार व पंच क्रमांक 01 हे आम्ही थांबलेल्या ठिकाणी परत आले. त्यावेळी पोशि आडके यांनी तक्रारदार यांचेकडील व्हॉईस रेकॉर्डर काढून घेवून तो बंद केला. ती वेळ 16.22 वा.ची होती. त्यानंतर पोलीस निरीक्षक शेडगे यांनी पंच क्र.1 श्री.वेदंाग बिबवे यांना पडताळणी कारवाई कामी पाठविलेपासून परत येईपर्यतची हकिकत विचारली असता त्यांनी सांगितले की,तक्रारदार व सर्कल यांच्यात सातबारानोंदीबाबत चर्चा झाली व सर्कल मोहिते यांनी तक्रारदार यांना सातबारा नोंद झाल्यावर बघू असे बोलून तक्रारदार यांना जाण्यास सांगितलेत्यामुळे तक्रारदार व पंच क्रं 1 हे अभिषेक मंगल कार्यालय निरा बारामती रोड येथे आले अशी हकिकत पंच क्र.1 श्री बिबवे यांनी सांगितली.

त्यानंतर आम्ही पंचासमक्ष तक्रारदार श्री. किर्तीराज लकडे यांना घडलेल्या हकिकतेबाबत विचारणा केली असतात्यांनी पंच क्र.1 यांचेप्रमाणेच मिळती जुळती सर्व हकिकत सांगितली.त्यानंतर आम्ही पंचासमक्ष पडताळणी दरम्यान व्हॉईस रेकॉर्डरमधील ध्वनिमुद्रीत फाईल क्र.3 ही त्यांचेकडील शासकीय लॅपटॉपवर कॉपी करून त्यामधील संभाषण पंचासमक्ष ऐकले असता ते पंच क्र.1 व तक्रारदार लकडे यांनी सांगितलेल्या हकिकतेप्रमाणे बरोबर असल्याची आमची खात्री झाली.तक्रारदार यांचे जमीनीची तलाठी कार्यालयाने 07/12 सदर नोंद घेतल्यानंतर पुढील पडताळणी कार्यवाही करण्याचे आम्ही ठरवून दि.26/2/2026 रोजीची पडताळणी कारवाई स्थगित करणेत आली व पुढील कारवाई तक्रारदार यांचा फोन आल्यानंतर करण्याचे ठरविले त्याप्रमाणे सर्वाना तशा सुचना दिल्या.सदरबाबत सविस्तर पंचनामा करण्यात आला आहे.

त्यानंतर दि.3/3/2026 रोजी तक्रारदार यांनी कोतवाल सोमनाथ महानवर यांना त्यांचे मोबाईल क्रंमाक 7709843821 यावर संपर्क करुन त्यांचे सातबारा नोंदीचे कामाबाबत चौकशी केली असता सोमनाथ महारनवर यांनी तक्रारदार यांना सातबारा नोंद घेतली असून पेमेंट पाठवा असा मॅसेज केला असल्याचे तक्रारदार यांनी आम्हाला कळविल्यावरुन आम्ही पुढील पडताळणी कारवाई दि.4/3/2026 रोजी करण्याचे ठरवून तक्रारदार यांना कळविले असता तक्रारदार यांनी सोमेश्वर मंदिर सोमेश्वर याठिकाणी येण्यास सांगितले.त्याप्रमाणे आम्ही सापळा पथक व पंचाना दि.4/3/2026 रोजी लाप्रवि पूणे येथे सकाळी 09.00 वाजता हजर राहण्याच्या सूचना दिल्या.

त्यानंतर दि.04/03/2026 रोजी ठरल्याप्रमाणे आम्ही,सापळा पथक पोशि कुमकर,पोशि आडके,पोशि तावरे, चालक पोशि दिवेकर व पंच साक्षीदार असे लाचलुचपत प्रतिबंधक पुणे कार्यालय येथून शाशकीय वाहन क्र एमएच 12 आरवाय 7271याने 09.00 वा. रवाना होवून तक्रारदार यांनी सांगितल्याप्रमाणे सोमेश्वर मंदिर सोमेश्वर याठिकाणी 11.24 वाजता पोहचलो.थोडयाच वेळात तक्रारदार हे त्यांचेकडील मोटार कार क्र एमएच 12 डब्ल्यू के 8418 सह हजर झाले.आम्ही तक्रारदार व पंचाना सापळा पथकामध्ये नव्याने हजर झालेले चालक पोशि दिवेकर यांची ओळख करुन दिली. त्यानंतर आम्ही उपस्थित सर्वांना सापळा कारवाईच्या अनुषंगाने योग्य त्या सुचना दिल्या. तसेच दि.26/2/2026 रोजी पडताळणी कारवाई दरम्याण वरील वर्णनाचे दोन्ही सिलबद मेमरीकार्ड पुढील कारवाईकरीता वापरण्यात येणार असल्याचे सांगून ते तक्रारदार व पंच यांना दाखविले. त्यानंतरसुमारे 11.48 वाजता तक्रारदार श्री.लकडे, पंच क्र.1 श्री वेदांग बिबवे व पंच क्र.2 श्री समीर गायकवाड यांची पडताळणी निवेदने ध्वनिमुद्रीत केली. त्याचप्रमाणे सदर निवदेनाचे व्हिडीओ चित्रीकरण करण्यात आले आहे.त्यानंतर पोशि आडके यांनी 11.54 वा. व्हाईस रेकॉर्डर पुन्हा चालू करुन तो तक्रारदार यांच्या शर्टचे आतील बाजुस बनियानला सेफ्टीपिनचे सहाय्याने लावला व तक्रारदार श्री.लकडे व पंच क्र.1 श्री.बिबवे असे तक्रारदार यांचेकडील चारचाकी वाहन क्र. एम एच 12 डब्लु के 8418 ने वडगाव निंबाळकर येथाील सर्कल कार्यालयात सर्कल मोहिते यांची भेट घेण्याकरीता रवाना केले.

त्यानंतर काही वेळाने तक्रारदार व पंच क्रमांक 01 हे आम्ही थांबलेल्या ठिकाणी परत आले. त्यावेळी पोशि आडके यांनी तक्रारदार यांचेकडील व्हॉईस रेकॉर्डर काढून घेवून तो बंद केला. ती वेळ 12.45 वा.ची होती. त्यानंतर पोलीस निरीक्षक शेडगे यांनी पंच क्र.1 श्री.वेदांग बिबवे यांना पडताळणी कारवाई कामी पाठविलेपासून परत येईपर्यंतची हकिकत विचारली असता त्यांनी सांगितले की, पंच क्र 1 व तक्रारदार असे तक्रारदार यांचे चारचाकी वाहनाने वडगाव निंबाळकर येथील सर्कल कार्यालयात गेले. तक्रारदार व पंच क्रं 1 सर्कल मोहिते यांचे कक्षात गेले त्यावेळी तक्रारदार यांनी लोकसेवक सर्कल यांना तक्रारदार यांचे जमीनीबाबतची नोंद 7/12 उता-यावर तलाठी कार्यालयाने घेतल्याची माहिती दिली. त्यावेळी सर्कल मोहिते यांनी नोंदी बाबतची कागदपत्रे तलाठी कार्यालयाकडून सर्कल कार्यालयाकडे येवू दया नंतर पाहू असे तक्रारदार यांना सांगितले. तक्रारदार यांनी कोतवाल महारनवर यांना फोन करुन तक्रारदार यांनी त्यांचे फोनचा स्पीकर ऑन करून बोलणे सुरु केले. त्यावेळी तक्रारदार यांनी "कुठं येतोय" असे विचारले असता लोकसेवक महानवर यांनी "निंबुतला" असे सांगितले त्यावर तक्रारदार यांनी "निबुतला वय सर्कलकडं जायचं म्हणत होतो मी तुला आलतो इकडं" असे सांगितले असता त्यावर लोकसेवक महारनवर यांनी "जाऊ की नाय काय अडचण" असे बोलून आणखी थोडी चर्चा केली व फोन कट केला. त्यानंतर कोतवाल महानवर यांचेशी बोलणे झाल्यानंतर तक्रारदार व पंच क्रं 1 पुन्हा सर्कल मोहिते यांचे केबिनमध्ये गेले. त्यावेळी तक्रारदार व लोकसेवक मोहिते यांचेत पुन्हा तक्रारदार यांचे कामासंदर्भाने चर्चा झाली त्या दरम्यान तक्रारदार लकडे हे सर्कल मोहिते यांना म्हणाले "त्यामुळचं मी म्हटलं साहेबांची गाठ घेतो बाबा तु कायतरी लईच सांगतोय..म्हटलं थांब मी घेतो त्यांच्याकडुन काढुन..म्हणुन त्याला म्हटलं ती नोंदधर म्हटला घ्या तलाठयाकडुन लावुन तुम्ही ..तर म्हटलं त्या मॅडमकडे गेल्यावर मॅडम सांगती सोमाचं नाव..त्याला म्हटलं तु नोदं लावुन देतु सांग कायती क्लेअर करतो मग..मग मी बोलो भाउसाहेबांची गाठ घेतो म्हणलं मी पहिल्यादा गाठ पण मी घ्यायला आलो नसतो तुमची..पहिल्यादा दहा सांगितल ..परत म्हणला दहा अर म्हणलं थांब मी साहेबांची गाठ घेतु"असे बोलले असतात्यावर सर्कल मोहिते यांनी"नका काळजी करु जावा ..माझ्या कडं कागदं आली की करतो मी" असे सांगुन सर्कल यांनी जाण्यास सांगितल्याने तेथून पंच क्रं 1 व तक्रारदार असे आम्ही थांबलेल्या ठिकाणी परत आले. अशी हकिकत पंच क्र.1 बिबवे यांनी सांगितली.

त्यानंतर तक्रारदार लकडे यांना पडताळणी दरम्यान घडलेल्या हकिकतेबाबत विचारणा करता त्यांनी देखील पंच क्र. 1 बिबवे यांचेप्रमाणे मिळतीजुळती हकिकत सांगितली. त्यानंतर आम्ही पंचासमक्ष व्हॉईस रेकॉर्डरमधील ध्वनिमुद्रीत झालेल्या दोन्ही फाईल लॅपटॉपवर कॉपी करून त्यामधील फाईल क्र.4 मधील संभाषण ओपन साऊंड करून पंचासमक्ष फास्ट फॉरवर्ड करून ऐकले असता ते पंच क्र.1 बिबवे व तक्रारदार लकडे यांनी सांगितलेल्या हकिकतेप्रमाणे बरोबर असल्याची खात्री केली.

एकंदरीत दि.4/3/2026 रोजी सर्कल मोहिते यांचेकडे केलेल्या पडताळणी कार्यवाही दरम्यान लोकसेवक कोतवाल महारनवर यांनी सर्कल यांचेकडे एकटे गेल्यास ते बोलणार नाही मी अध्र्यातासात येतो आपण दोघे जावू असे तक्रारदार यांना सांगितल्याने तक्रारदार व पंच क्र.1 यांना पुन्हा लोकसेवक कोतवाल महारनवर यांची भेट घेण्याकरीता पाठवून त्यांचेसोबत सर्कल कार्यालय येथे जावून सर्कल मोहिते यांची पडताळणी करण्याचे आम्ही ठरविले.

त्यानंतर पोशि आडके यांनी व्हॉईस रेकॉर्डर पुन्हा 14.03 वाजता चालु करून तो तक्रारदार यांना त्यांचे बनियानचे आत सेफ्टीपिनचे सहाय्याने लावला. त्यानंतर तक्रारदार व पंच क्र.1 असे तक्रारदार यांचे नमूद चारचाकी वाहनाने लोकसेवक महारनवर यांना भेटून त्यांचेसोबत लोकसेवक सर्कल मोहिते यांना भेटण्यासाठी रवाना करण्यात आले. त्यानंतर तक्रारदार व पंच परत आले. त्यावेळी पोशि आडके यांनी तक्रारदार यांचेकडील व्हॉईस रेकॉर्डर काढून बंद केला ती वेळी 15.08 वाजण्याची होती. त्यावेळी आम्ही पंच क्र.1 यांना ते रवाना होवून परत येईपर्यंतच्या हकिकतेबाबत विचारणा केली असता पंच क्र.1 यांनी पंच क्र.2 यांचे समक्ष सांगितले की, ते व तक्रारदार असे वाघळवाडीचे दिशेने रवाना झाल्यानंतर सोमेश्वर पेट्रोल पंपामध्ये जावून लोकसेवक महारनवर यांची वाट पाहत थांबले असताना लोकसेवक महारनवर सदर ठिकाणी आले. ते तक्रारदार यांचे चारचाकी वाहनात बसले त्यावेळी त्यांचेत तक्रारदार यांचे कामा संदर्भाने चर्चा झाली. त्या चर्चे दरम्यान लोकसेवक महारनवर "आता कसं काय करायचं...". असे बोलले असता त्यावर तक्रारदार "तेच म्हणतो साहेबाला कमी करायला...10 एक हजार घेतले असते तर बरं झालं असतं..." त्यावर लोकसेवक महारनवर "हम्म नाही......पंधरा पर्यंत त्यांना हे केलंय....पंधरा..." त्यावर तक्रारदार "म्हणजे मॅडम बिडम सगळे भागत्याल असं....." त्यावर लोकसेवक "मॅडमचे जाऊद्या...मॅडमचं करतो मी.....हजार दोन हजार रुपये...." असे बोलल्यानंतर तक्रारदार थोडी तडजोड करून "नाय पेमेंटचं करतोच की.... तेच म्हणलं साहेबांना....बोलुन बघावं..." असे बोलले असता त्यावर लोकसेवक "नाय....मी त्या दिवशीच तुम्हाला म्हणलं ते मानसांमुळ बोलायचे नाहीत...काल परवा दिवशी म्हणलं काय ते धरलं का नाय कालंच धरलंय परंतु केलयं

बघिंतलच नोंद बरोबर बघितली का....तेच आत्ता त्यांचाच फोन येतोय मला काय झालं....."असे बोलले असता त्यावर तक्रारदार आणखी थोडी चर्चा करून "पेमेंटचं नाय रे.....तेच अँडजस्ट करून म्हणलं....आकडं कसं कळलं....काय मागतो कोणाला....नाई जाऊद्या मग" असे बोलले असता त्यावर लोकसेवक महारनवर नाई जाऊद्या मग....पंधरा द्या ना मग....बघु असे तक्रारदार यांना बोलून सर्कल मोहिते यांचेकरीता तडजोडी अंती रु.15,000/- रक्कम घेवून येण्यास सांगितले. त्यानंतर पंच क्रं 1 व तक्रारदार आम्ही थांबलेल्या ठिकाणी परत आले. अशी हकिकत पंच क्र.1 यांनी सांगिंतल्यानतर आम्ही तक्रारदार यांना घडलेल्या हकिकतेबाबत विचारणा केली असता त्यांनी देखील पंच क्र.1 यांचेप्रमाणेच मिळती जुळती हकिकत सांगितली. त्यानंतर आम्ही व्हॉईस रेकॉर्डरमधील फाईल ध्वनिमुद्रीत फाईल क्र.8 फास्ट फारवर्ड करून ओपन स्पीकर करुन पंचासमक्ष ऐकली असता सदर संभाषण तक्रारदार व पंच क्र.1 यांनी सांगितलेल्या हकिकतेप्रमाणे बरोबर असल्याची खात्री केली.

त्यानंतर आम्ही दोन्ही पंचांसमक्ष तक्रारदार यांना लाच रक्कम हजर करणेस सांगितले असता तक्रारदार यांनी लाच रक्कम 15,000/- रुपये हजर केले.त्यानंतर पोशि आडके यांनी नमुद नोटांचे नंबर पंच क्र.02 गायकवाड यांचे मदतीने कागदावर लिहुन काढले त्यावर आम्ही व पंचांनी सहया केल्या.

त्यानंतर तात्काळ सापळा कारवाई आयोजीत करण्याचे ठरवले.त्यानंतर आम्ही दोन्ही पंचांना सापळा कारवाई यशस्वी झाल्यास लोकसेवकाची "अंगझडती व लाचेची रक्कम"जप्त करण्याच्या कारवाईचे चित्रीकरण करण्यात येणार असल्याचे सांगितले.त्यानंतर आम्ही शासकिय वाहना मध्ये दोन्ही पंचांना व तक्रारदार लकडे यांना अन्थ्रासिन पावडरचे गुणधर्म समजावून सांगून त्याचे प्रात्यक्षिक करून दाखवले.

त्यानंतर आम्ही लाचेकामी वापरावयाची रक्कम रुपये 15,000/-(रूपये 500/- दराच्या 30 चलनी नोटा) ही चालक पोलीस शिपाई दिवेकर यांना अँन्थ्रासीन पावडर लावण्याकरीता दिल्या असता,पोलीस शिपाई दिवेकर यांनी कापसाच्या बोळयाने प्रत्येक चलनी नोटांच्या दोन्ही बाजूस अँन्थ्रासीन पावडर लावली.त्यांनतर चालक पोलीस शिपाई दिवेकर यांनी सदर लाचेची रक्कम तक्रारदार किर्तीराज लकडे यांच्या शर्टच्या समोरील बाजूस डाव्या खिशात ठेवली.

त्यानंतर सापळा कारवाईचे अनुषंगाने आम्ही पंचासमक्ष डिजीटल व्हाईस रेकॉर्डर चालू करून व पोशि तावरे यांनी व्हिडीओ कॅमेरामध्ये चित्रीकरण चालु करुन त्यामध्ये तक्रारदार लकडे त्यानंतर दोन्ही पंचांचे सापळा निवेदन घेतले ती वेळ 16.30 वा होती.त्यानंतर भेटण्याचे ठिकाण निश्चितीकरीता तक्रारदार यांना कोतवाल महारनवर यांना फोन करण्यास सांगितलेवरुन तक्रारदार यांनी त्यांचा मोबाईल क्र. 9545000550 वरुन लोकसेवक महारनवर यांचा मोबाईल क्र. 7709843821 वर संपर्क साधला असता लोकसेवक महारनवर यांनी तक्रारदार यांना लाचेची रक्कम घेवून निरा जवळील खंडोबाची वाडी येथे येण्यास सांगितले.

त्यानंतर कोतवाल सोमनाथ महारनवर यांनी मागणी केलेली लाच रक्कम देणेकरीता तक्रारदार यांना शासकिय व्हॉईस रेकॉर्डर चालू करुन त्यांनी परीधान केलेल्या शर्ट चे आतील बनयिन ला सेफटी पीनच्या सहाय्याने लावुन देऊन शासकिय पंच क्र.1 श्री.बिबवे यांचेसह तक्रारदार यांचेकडील चारचाकी वाहनाने निरा बारामती रोडवरील इंडीयन पेट्रोलपंप येथे जाण्यासाठी रवाना केले ती वेळ 16.44 वा. होती. त्यांचे पाठोपाठ सापळा पथक रवाना झाले निरा बारामती रोडवरील इंडीयन पेटोलपंपाच्या थोडे पूढे हॉटेल महाकाली रसवंती ग्रह येथे जावून शासकिय वाहन कोणास संशय येणार नाही अशा प्रकारे थांबवले व पंच क्र.02 व सापळा पथक शाशकीय वाहनातून खाली उतरुन कोणासही संशय येणार नाही अशारितीने विखरुन थांबून कोतवाल सोमनाथ महारनवर यांची वाट पाहत थांबलो काही वेळात तक्रारदार यांचे मोटार कारच्या बाजुला एक होन्डा कंपनीची डिलक्स क्र.एमएच 42 एटी 3097 हया दुचाकी वाहनावर पाठीवर राखाडी रंगाची सॅक असलेला एकइसम असा येवून थांबला. त्यावेळी तक्रारदार यांनी गाडीची विन्डो ग्लास खाली घेवून त्याचेशी बोलणे चालु केले. थोडी चर्चा झाल्यानंतर सदर इसमाने त्याचे दुचाकी वाहन सदर ठिकाणावरून हालवून हॉटेल महाकाली रसवंती गृहाचे समोर सदर इसम व तक्रारदार यांनी त्यांची वाहने थांबविली. त्यानंतर सदर इसम त्यांचे दुचाकीवरून उतरून तक्रारदार यांचे चारचाकी वाहनात ड्राईव्हर सीटचे बाजुच्या सीटवर बसला. थोडयाचे वेळात पंच क्र.1 तक्रारदार यांचे नमूद चारचाकी वाहनातुन उतरुन सुमारे 3-4 मीटर अंतरावर उभे राहिले. त्यानंतर पुढील थोडयाच वेळात तक्रारदार यांनी त्यांचे चारचाकी वाहनाच्या चारही पार्किंग लाईट चालू करून लाच रक्कम स्वीकारलेबाबत पुर्व नियोजीत इशारा केला.

त्यानंतर आम्ही,पंच क्र.02 व पथक तक्रारदार यांच्या मोटार कार जवळ गेलो आम्ही दिलेल्या सुचनेनुसार पोशि कुमकर यांनी तात्काळ शासकिय कॅमेरामध्ये चित्रीकरणास सुरुवात केली.त्यानंतर पोशि आडके यांनी तक्रारदार यांना लावण्यात आलेला डिजीटल व्हाईस रेकॉर्डर काढून बंद केला ती वेळ 17.25 वा.ची होती.त्यावेळी पंच क्रमांक 1 श्री.बिबवे यांनी अंगुली निर्देश करुन हेच कोतवाल महारनवर असल्याचे सांगितले.त्यावेळी आम्ही लाचलुचपत प्रतिंबधक विभागाचे अधिकारी असल्याचे सांगून त्यांना हालचाल करण्यास मनाई केली.त्यानंतर पोशि आडके यांनी

त्यांचे दोन्ही हात मनगटाजवळ पकडून ताब्यात घेतले.त्यांनतर आम्ही ओळखपत्र दाखवून स्वत:ची व सापळा पथकाची ओळख सांगितली.

त्यानंतर तक्रारदार यांना कोतवाल महारनवर यांनी स्विकारलेली लाच रक्कम कुठे ठेवली आहे असे विचारले असता तक्रारदार यांनी कोतवाल महारनवर यांनी लाच रक्कम उजव्या हाताने स्विकारुन त्यांचेकडील राखाडी रंगाच्या सॅकमध्ये दोन नंबरच्या कप्प्यात ठेवली असल्याचे सांगितले.त्यानंतर आम्ही कोतवाल सोमनाथ महारनवर यांना लाच रकमेबाबत विचारणा केली असता त्यांनी सदरची लाच रक्कम त्यांचेजवळील राखाडी रंगाच्या सॅकमध्येदोन नंबरच्या कप्प्यात असल्याचे सांगितले. त्यानंतर पंचासमक्ष कोतवाल सोमनाथ महारनवर यांनी लाच रक्कम सॅक मधून काढली.त्यावेळी पंच क्र.02 श्री.गायकवाड यांनी लाचेची रक्कम ताब्यात घेवून मोजली असता ती रुपये 15,000/- असल्याचे दिसून आले.त्यानंतर सदर नोटांचे सापळापुर्व कारवाई दरम्यान कागदावर लिहून ठेवलेल्या नोटांच्या नंबरशी खात्री केली असता ते तंतोतंत जुळून आले.त्यानंतर आरोपी महानवर यांचेकडूनताब्यात घेतलेली लाच रक्कम अल्ट्राव्हायलेट दिव्याच्या प्रकाशात पाहिली असता त्यावर फिक्कट निळसर रंगाची चकाकी दिसून आली.त्यानंतर कोतवाल महारनवर यांची तपासणी केली असता त्यांचे उजव्या हाताला व सॅकच्य दोन नंबर कप्यामध्ये अॅन्थ्रॉसीन पावडरची फिक्कट निळसर रंगांची चकाकी दिसून आली. तसेच तक्रारदार लकडे यांच्या हाताची व कपडयाची तपासणी केली असता,लकडे यांच्या दोन्ही हाताच्या बोटांच्या वरील भागास अँन्थ्रॉसीन पावडरची फिक्कट निळसर रंगाची चकाकी दिसून आली. तसेच शर्टच्या पुढील बाजूच्या डाव्या खिशाचे तोडांवर व आतील बाजुस अॅन्थ्रॉसीन पावडरची फिक्कट निळसर रंगाची चकाकी दिसून आली.त्यानंतर पंच क्र.02 यांचे हाताची तपासणी केली असता त्यांचे उजव्या हातास अँन्थ्रॉसीन पावडरची फिक्कट निळसर रंगाची चकाकी दिसून आली.

त्यानंतर कोतवाल यांना त्याचे नाव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव. श्री सोमनाथ संपत महानवर वय 35 वर्षे व्यवसाय- शेती व निंबुत तलाठी कार्यालय येथे कॅन्डीडेट म्हणून काम करणे रा.मु.गडदरवाडी पो. खंडोबाचीवाडी ता. बारामती जि. पुणे असे सांगितले. यावरून लोकसेवक सोमनाथ महारनवर यांचे आडनाव महानवर असे असून ते लोकसेवक नसून खाजगी इसम असल्याचे निष्पन्न झाले. तसेच ते कोतवाल नसून सर्कल कार्यालय वडगाव निंबाळकर व तलाठी कार्यालय निंबूत येथे कॅन्डीडेत् म्हणून काम करीत असल्याचे समजले. त्यानंतर आम्ही खाजगी इसम सोमनाथ महानवर यास त्यांने स्वीकारलेली रक्कम कोणाकरीता स्वीकारली अशी विचारणा केली असता सोमनाथ महानवर यांनी सदर रक्कम लोकसेवक सर्कल मोहिते यांचेसाठी स्वीकारल्याचे पंचासमक्ष सांगितले व तक्रारदार यांनी सर्कल मोहिते यांचेशी फोनवर बोलायचे आहे अशी विंनती केली. त्यानुसार पोशि तावरे यांनी व्हॉईस रेकॉर्डर चालु करून तो खाजगी व्यक्ती महानवर यांचे समोर धरला असता खाजगी इसम महानवर यांनी त्यांचा मोबा.क्र. 7709843821 वरून लोकसेवक सर्कल मोहिते यांचा मोबा.क्र.9881037349 वर दोनवेळा संपर्क असता रिंग वाजली परंतु लोकसेवक सर्कल यांनी कॉल रिसिव्ह केला नाही. त्यामुळे व्हॉईस रेकॉर्डर बंद केला. थोडा वेळ गेल्यानंतर लोकसेवक सर्कल यांनी त्यांचे नमूद मोबाईल क्रमांकावरून महानवर यांचे नमूद मोबाईल क्रमांकावर फोन केला असता तक्रारदार यांनी तो उचलून फोनचा स्पीकर ऑन केला त्यावेळी लोकसेवक सर्कल मोहिते यांनी का सारख फोन करतोय अशी विचारणा केली असता महानवर हळु आवाजात पुटपुटले. त्यानंतर फोन कट झाला. त्यावर महानवर यांनी पुन्हा लोकसेवक सर्कल यांना फोन केला असता लोकसेवक सर्कल यांनी का फोन करतोय अशी पुन्हा विचारणा केली असता महानवर यांनी “लकडेंनी पैसे दिलते काय” असे बोलले असता त्यावर लोकसेवक सर्कल “मला नको फोन करू काय” असे बोलून फोन कट केला. सदरचे दोन्ही कॉल पोशि तावरे यांनी ध्वनिमुद्रीत केले आहेत.

त्यानंतर आम्ही पंचा समक्ष तक्रारदार यांना सापळा कारवाई दरम्यान घडलेल्या हकिकतेबाबतच विचारणा केली असता त्यांनी सांगितले की, “तक्रारदार व पंच क्र.1 असे सोमेश्वर मंदिर सोमेश्वर येथून तक्रारदारांच्या चारचाकी वाहनाने निंबुत खंडोबाची वाडी गावाजवळ रोडलगत असलेल्या इंडियन ऑईल पंपासमोर येवून थांबले असताना सदरठिकाणी आरोपी महारनवर हे त्यांच्याकडील मोटारसायकल ने सदरठिकाणी आले व तक्रारदारांच्य गाडीमध्ये बसून त्यांनी किती येत पंधरा आहेत ना असे बोलून तक्रारदाराकडून लाचेची रक्कम स्विकारुन त्यांचेकडील सॅक मध्ये ठेवली. सदरबाबत सविस्तर पंचनामा करण्यात आला आहे. पंचनामादरम्यान जप्त मेमरीकार्डसची हॅशव्हॅल्यु काढण्यात आली आहे.

तरी दि.26/02/2026 रोजी 11.22 ते 17.20 वा दरम्याण सर्कल कार्यालय वडगाव निंबाळकर येथे करण्यात आलेल्या पडताळणी कारवाई दरम्याण यातील आरोपी खाजगी इसम सोमनाथ महानवर यांनी तक्रारदार यांच्या सातबारा नोंदी घेण्याकरीता वडगाव निंबाळकर सर्कल मोहिते यांचेकरीता 20000/-व तलाठी जयश्री तनपूरे यांचेकरीता 5000 ते 6000 लाचेची रक्कम मागणी केल्याचे निष्पन्न झाले तसेच दि.4/3/2026 रोजीच्या 11.24

ते 17.25 वाजता दरम्यान सोमेश्वर पेटोलपंपाजवळील गायकवाड बिल्डींगजवळ करण्यात आलेल्या पडताळणी पंचानामा कारवाई दरम्यान यातील आरोपी खाजगी इसम सोमनाथ संपत महानवर यांनी तक्रारदार यांच्या सातबारा नोंदी सर्कल यांचेकडून प्रमाणित करण्याकरीता सर्कल मोहिते यांचेकरीता 15000 रुपये व तलाठी जयश्री तनपूरे यांचेकरीता 1 ते 2 हजार रुपयाची लाचेची मागणी पंचासमक्ष करुन तडजोडीअंती दि.4.03.2026 रोजी हॅाटेल महाकाली रसव्ंती ग्रह निरा बारामती रोड येथेतक्रार दार यांची चार चाकी वाहनामध्ये बसुन खाजगी इसम सोमनाथ महानवर यांनी पंचासमक्ष 15,000/- रुपये लाच रक्कम तक्रारदार किर्तीराज लकडे यांचेकडुन स्विकारली म्हणुन माझी सोमनाथ संपत महानवर वय 35 वर्षे धंदा शेती(कॅन्डीडेत निंबूत तलाठी कार्यालय व सर्कल कार्यालय वडगाव निंबाळकर)रा.गडदरवाडी पोस्ट खंडोबाची वाडी ता.बारामती जि.पुणे.यांचे विरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम 1988 चे कलम 7 अ प्रमाणे कायदेशिर सरकारतर्फे फिर्याद आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

Nagnath Gurusiddh patil(I (Inspector)) / API2015 **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पोलीस ठाणे अंमलदार
वडगांव निंबाळकर पोलीस स्टेशन

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name (नाव):** Nagnath Gurusiddh
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** API2015